दैनिक


# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार, 18 एप्रिल 2026 | अंक क्र. 328 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







# लोकसभेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर

## प्रियांका गांधींचा दावा : "हा लोकशाहीचा विजय"



नवी दिल्ली : वृत्तसंस्था

लोकसभेत केंद्र सरकारने सादर केलेले महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झाल्याने संसदेतील राजकारण चांगलेच तापले आहे. सरकारसाठी हा मोठा धक्का मानला जात असून विरोधकांनी याला आपला राजकीय विजय म्हणून सादर केले आहे.

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया देत मोदी सरकारवर निशाणा साधला. संसदेतून बाहेर पडताना त्यांनी पत्रकारांना उद्देशून टोला लगावत विचारले, विधेयक नामंजूर झाल्यावर पंतप्रधानांचा चेहरा पाहिला का?" त्यांनी पुढे म्हटले की, "हे केवळ महिला आरक्षणाचे विधेयक नव्हते, तर संविधानाच्या चौकटीत बदल घडवण्याचा एक प्रयत्न होता. आम्ही तो ओळखला आणि हाणून पाडला.

याच मुद्द्यावर त्यांनी सोशल मीडियावरही प्रतिक्रिया देत "महिलांच्या नावाखाली संविधानाचा अवमान करण्याचा प्रयत्न झाला, पण INDIA आघाडीने तो रोखला," असे नमूद केले.

काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांनीदेखील सरकारवर टीका करत म्हटले, "हा लोकशाहीचा आणि देशाच्या एकतेचा विजय आहे. हे विधेयक म्हणजे संविधानावरचा हल्ला होता, जो आम्ही उधळून लावला."

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे खासदार अरविंद सावंत यांनीही केंद्र सरकारवर निशाणा साधत विरोधकांच्या भूमिकेला समर्थन दिले.

### नेमके काय घडले?

कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लोकसभेत महिला आरक्षणासंबंधी घटनादुरुस्ती विधेयक मांडले. मतदानावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी लॉबी रिकामी करण्याचे आदेश दिले.

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 368 नुसार, कोणत्याही घटनादुरुस्ती विधेयकासाठी दोन तृतीयांश बहुमत आवश्यक असते. एकूण 540 मतांपैकी किमान 360 मतांची गरज होती. मात्र, या विधेयकाला फक्त 298 मते समर्थनार्थ मिळाली, तर 230 सदस्यांनी विरोधात मतदान केले. त्यामुळे हे विधेयक 62 मतांनी अपयशी ठरले.

संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी 131 वी घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झाल्यानंतर इतर दोन विधेयके पुढे न मांडण्याचा निर्णय घेतला.

# देऊळगाव घाट येथे आ.सुरेश धस यांच्या हस्ते नवीन पुलाचे भूमिपूजन



आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील देऊळगाव घाट येथे नृसिंह मंदिराशेजारी बांधण्यात येणाऱ्या पुलाच्या कामाचे भूमिपूजन शुक्रवारी आ.सुरेश धस यांच्या हस्ते संपन्न झाले. मतदारसंघातील विकासकामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर या कामाला मंजुरी मिळाली.

सावरगाव – शेडाळा – देऊळगाव घाट – पिंपळगाव – वडगाव (प्रजिमा-६५, कि.मी. १२/००) या मार्गावर सुमारे १ कोटी ५० लाख रुपये खर्चून पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. या पुलामुळे परिसरातील दळणवळण अधिक सुरक्षित व जलद होणार असून शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.पहिला जीर्ण झालेला पूल हा वाहतुकीसाठी धोक्याचा बनला होता.

याच बरोबर, देऊळगाव घाट येथे सुमारे १० लाख रुपये खर्चून सभागृह उभारण्यात येत असून त्या कामाचे देखील भूमिपूजन यावेळी करण्यात आले.या सभागृहामुळे स्थानिकांना सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत.तर दौलावडगाव येथे 40 लक्ष रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या नदी वरील पुलाचे लोकार्पण देखील करण्यात आले.यावेळी बोलताना आ.धस म्हणाले की,भविष्यातही मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न सुरू ठेवण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाला कृषिभूषण बाबासाहेब पिसोरे,अशोक इथापे,महेश म्हस्के, कारखेल सरपंच रघुशेठ घुले,अशोक दहातोंडे,शिवाजी थोरात,विजय दानवे,सुखदेव खकाळ, सालेवडगाव सरपंच महेश कराळे,छगन बागले,गोवर्धन ठोंबरे, आबा शिंदे,रावसाहेब शिरसाठ, घाटा पिंपरी सरपंच मोहन आमटे,नाना आमले,अजिनाथ वायभासे,मोहन मराठे,बबलू कुरेशी,एकनाथ वाणी, गोटीराम कोहोक,बाबू खान, वहाब पटेल,जलील कुरेशी,प्रवीण वाणी, अभिमन्यू परभणे, विशाल उमाप, बाळू मुळे,शरद दहातोंडे,यांच्यासह आदी ग्रामस्थ, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बामणी येथील जळीतग्रस्त कुटुंबीयास आ. कराड यांच्याकडून मदतीचा हात

लातूर |प्रतिनिधी

पोटाची खळगी भरण्यासाठी झाडू तयार करून विक्री करणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथील श्रीहरी कांबळे यांच्या घरास मध्यरात्री अचानकपणे आग लागून झालेल्या दुर्घटनेत संपूर्ण संसार जळून खाक झाला. संपूर्ण कुटुंब उघड्यावर आल्याने लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी सदरील कुटुंबीयास तातडीने संसार उपयोगी साहित्यासह इतर मदत करून दिलासा दिला आहे.

गेल्या दोन पिढ्यापासून झाडू तयार करून विक्री करणे त्यातून मिळालेल्या चार पैशात कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथील सत्तर वर्ष वयाचे श्रीहरी लालबा कांबळे यांच्यासह कुटुंबात सहाजण असून हे सर्वजण झाडू बनवण्याचा व्यवसाय करतात गेल्या दोन पिढ्यापासून या व्यवसायावर हे कुटुंब अत्यंत आनंदी आणि सुखी जीवन जगत होते.

गेल्या १५ एप्रिल २०२६ रोजीच्या मध्यरात्री अचानकपणे शॉर्ट सर्किट होऊन झाडू बनविण्याच्या कच्च्या मालाला आग लागून झाडूच्या कच्च्या मालासह घरातील सर्व कपडे, अन्नधान्य संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले. यात दोन अडीच लाखाचे नुकसान होऊन काही क्षणातच हे संपूर्ण कांबळे कुटुंबीय उघड्यावर आले.

सदरील घटनेची माहिती समजतात भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी श्रीहरी कांबळे आणि त्यांच्या कुटुंबातील मालनबाई कांबळे, लक्ष्मण



कांबळे, गजानन कांबळे, राम कांबळे, सीता कांबळे, कल्याण कांबळे या सर्वांना दैनंदिन वापराचे कपडे, अंथरून, पांघरून, संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडी, किराणा साहित्य यासह सर्व प्रकारची तातडीची मदत त्याचबरोबर जळीतग्रस्त कांबळे कुटुंबीयास तात्काळ शासनाची घरकुल योजना मंजूर करून देण्यात यावी अशी सूचना तहसिलदार सौदागर तांदळे यांना केली.

याप्रसंगी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंके, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, प्रताप पाटील, सुरज शिंदे, गोविंद नरहरी विजयकुमार मलवाडे, संजय ठाकूर, हनुमंत गव्हाणे, ज्ञानोबा शेळके, मारुती शिंदे, आदिनाथ मुळे, सतीश बिराजदार, रुपेश काळे सुरेखा पुरी, सचिन साबदे, सुरेश पाटील यांच्यासह अनेक जण होते.

# बीड पोलिसांचा गुटखा माफियांना दणका; कारसह लाखो रुपयांचा साठा जप्त

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात अवैध गुटखा विक्रीला चाप लावण्यासाठी पोलिसांनी मोठी मोहीम उघडली आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलिसांनी दि. १५ आणि १६ एप्रिल रोजी शहरातील विविध ५ ठिकाणी धाडी टाकून तब्बल ८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पोलिसांनी शहरातील विविध भागांत छापे टाकले. यामध्ये गुटखा, पान मसाला, मोबाईल फोन आणि वाहने जप्त करण्यात आली आहेत. कारसह गुटखा साठा सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरातून जप्त करण्यात आला.

**कडक कायदेशीर पाऊल :** या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या



विविध कलमान्वये (१२३, २२३, २७४, २७५, ३(५)) गुन्हा रजिस्टर नं. ८१/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**यांनी केली कारवाई :** ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपअधीक्षक व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव आणि कर्मचारी गहिनीनाथ बावनकर, सय्यद शहेनशहा, इलियास शेख, मंगेश शिंदे, राम पवार व फारुख शेख यांनी पार पाडली.

# जातनिहाय जनगणनेत ओबीसी जातीचा समावेश करून मुद्देनिहाय जनगणना करावी– वसंत मुंडे

परळी (प्रतिनिधी)

आर एस एस च्या मनुवादी विचारसरणीमुळे केंद्रातील भाजप सरकारने ओबीसी जातीचा जनगणनेत समावेश केला नसल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . भारत देशामध्ये जातनिहाय जनगणना ब्रिटिश सरकारने १९३१ ला चालू केली, त्यावेळेस पासून२०११ पर्यंत अनेक सरकारने जात निहाय जनगणना केली. परंतु भारत देशामध्ये ओबीसी आरक्षणा संदर्भात बीपी मंडल आयोग १९९० लागू करण्यात आले. परंतु भाजपा पक्षाचे धोरण आरक्षण विरोधी असून केंद्रातील व्ही पी सिंग सरकारचा मंडल आयोगाला विरोध म्हणून भाजपने पाठिंबा काढून घेऊन सरकार पाडले . मनमोहन सिंग पंतप्रधान असताना



देशात जात निहाय जनगणना२०११ ला मुद्देनिहाय करण्यात आली. महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस बीजेपीच्या सरकारने ओबीसीचा डाटा मुद्देनिहाय देण्यासंदर्भात वेळ काढून धोरण स्वीकारल्यामुळे दि.१२ जून२०१८ ला केंद्र सरकारला गुपित पत्र देऊन माहिती ठेवण्याचे सूचना आरएसएसच्या विचारधारेने बीजेपीच्या प्रत्येक राज्यातील सरकारला देण्यात आल्या त्यामुळे आरक्षण देण्यामध्ये संपूर्णपणे विलंब झाला. दीड टक्के जनगणनेचा डाटा न दिल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात निर्णय पेंटिंग पडला. मनमोहन सिंग सरकारने ओबीसी जनगणना संदर्भात पाच हजार कोटी रुपये खर्च केला परंतु ओबीसीचा डाटा ही राष्ट्रीय संपत्ती आहे ,भारता मध्ये पशुपक्षी जनगणना होते परंतु ओबीसीची जातनिहाय जनगणना होऊन देण्यामध्ये मनुवादी भाजपा पक्षाच्या विचारसरणीचा हात आहे . संपूर्ण देशामध्ये ५२ ते ७०% टक्के पेक्षा जास्त ओबीसीची लोकसंख्या आहे. भारतामध्ये ३००० पेक्षा जास्त जाती ओबीसी विभागात असून क्रिमिनल आट रद्द करून सामाजिक शैक्षणिक आर्थिक मागासलेपणा आधारावर वर्गीकरण करून जातनिहाय ओबीसी जनगणना करण्यात यावी. ओबीसी समाज जागा झाला तर राज्यातील व केंद्रातील सरकार निवडणुकीच्या माध्यमातून बदल होऊ शकतो अशी धास्ती भाजपच्या सरकारला असल्यामुळे ओबीसी वर सतत अन्याय केला जात असल्याचा आरोप काँग्रेसने नेते वसंत मुंडे्नी केला.

# चला फिरा अरुणाचल प्रदेश

अरुणाचल प्रदेश हे भारत ईशान्येकडील एक लोकप्रिय पर्यटन आहे. येथील झिरो हे सर्वात महत्त्वाचे स्थळ आहे. देवांचे शहर म्हणून याची ख्याती आहे. याठिकाणी एका प्रेरणेपेक्षा काही कमी नाही, दृष्टीस पडेल त्या प्रत्येक कोपऱ्यात एक आश्चर्य आहे आणि अशा बेसुमार ठिकाणांमुळे, अनेकदा एखादा पर्याय सुटू शकतो. गोष्टी सोप्या करून देण्यासाठी, येथे अरुणाचल प्रदेशातील झिरोमधील उत्तम ठिकाणे दिली आहेत.





## दऱ्यातील सर्व मार्ग

अरुणाचल प्रदेशातील टॅली व्हॅली अभयारण्य अनेक पर्यटकांना आकर्षित करते. तो अनेक चिंताजनक प्रजातींचे घर आहे असे म्हणतात. हे ठिकाण ऑर्किड, सिल्व्हर ओक आणि फर्नसह अनेक वनस्पती आणि त्यांच्या प्रजातीने समृद्ध आहे. पाच हजार वर्षे जुन्या आणि बहुतेक १९६२ मध्ये शोध लावण्यात आलेल्या मेघना गुहा मंदिराला नक्की भेट द्या.

## टेकडी चढणे

भर दुपारच्या वेळी आपटनी खोऱ्यातील विखुरलेली ब्लू अल्पाइनची झाडे बिंदू आहेत. ट्रेकिंगसाठी बूट घाला आणि या जागेत मनसोक्त हुंदडा. टोकडीवरील झिरो पुटो म्हणून ओळखले जाणारे ठिकाण प्रशासकीय मूल्य आहे. आपाटनी खोऱ्यात एक नेत्रदीपक दृश्य यामुळे दिसते आहे. हापोलीला जिल्हा प्रशासकीय मुख्यालय वसलेले आहे.

## मासे पकडायला जा

टरिन माश्यांची शेती देवदार आणि बांबूच्या उपवनाच्या दरम्यान जवळ आहे. अनेक माशांचे येथे प्रजनन आहे. बांबूचे उपवन एक रोमांचक ठिकाण आहे. जे निळ्या अल्पाइननेयुक्त आहे आणि हायकिंग आणि लांब ट्रेकिंगसाठी अभ्यागतांना पर्याय देते. टिपी ऑर्किड रिसर्च सेंटरने उष्णदेशीय पाऊस वनामध्ये आसरा घेतलेला आणि हे ऑर्किडच्या सुमारे १००० प्रजातींचे घर आहे. यामुळे पिशव्या पॅक करून अरुणाचल प्रदेशाचे आश्चर्यकारक जग अनुभवण्यास तयार व्हा.

# दैत्यासूर धबधबा



आंबिवलीहून पुढे जामरूग गावाकडे जाणाऱ्या वाटेवरील पुलाच्या आधी उजवीकडे वळल्यावर आपण डुक्कर पाड्यात पोहोचतो. येथूनच पुढे अनेक खासगी फार्म हाऊसचे प्रकल्प आहेत. हे फार्म हाऊस ज्या डोंगराच्या पायथ्याशी बांधले आहेत त्या डोंगराच्या माथ्यावर एक नैसर्गिक भगदाड म्हणजेच नेढे असल्यामुळे याला नाखिंडाचा डोंगर असे स्थानिक संबोधतात. कोथळीगडाच्या मध्यावर असलेल्या पेठेची वाडी गावाच्या समांतर उंचीवर नाखिंडा डोंगरालाही पदर सुटला आहे. (स्थानिके भाषेतील पदर म्हणजे एका विशिष्ट उंचीवर डोंगराला समांतर असलेले विस्तीर्ण पठार) याच पदरावरून अनेक धबधबे रांगेत खाली कोसळत असतात. यातलाच सर्वात मोठा धबधबा म्हणजेच दैत्यासूर धबधबा. कातळ भिंतीवरून रांगेत कोसळणारे हे धबधबे सजावटीसाठी लावलेल्या बत्ताशांच्या माळांप्रमाणे भासतात. या धबधब्याच्या तळाशी जाण्यासाठी तासाभराची बिकट चढाई करावी लागते. अजस्त्र धबधब्याचे रौद्र भीषण रूप पाहणे हा वेगळा अनुभव असला तरी तेथे जाणं धोक्याचे आहे. कारण हा प्रपात खूप उंचावरून कोसळत असतो. बिकट चढाईचे श्रम घ्यायचे नसल्यास फार्म हाऊसच्या प्रोजेक्टच्या मागे दोनचार कमी प्रवाहाचे धबधबे आहेत. तेथे पोहोचणे सोपे असून येथे धबधब्या खाली भिजण्याचा आनंद घेता येतो.



## सोलान पाडा बंधारा

कर्जत रेल्वेस्थानकापासून अंदाजे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या जामरूग गावाच्या पुढे सोलान पाडा नावाची छोटीशी वाडी आहे. या वाडीच्या पुढे डोंगर पायथ्याशी हल्लीच एक छोटासा बंधारा बांधण्यात आला. बंधाऱ्याचे अतिरिक्त पाणी वाहून जाण्यासाठी केलेल्या सांडव्याची टप्प्या टप्प्यात उतरत जाणारी अशी विशिष्ट पद्धतीची केलेली बांधणी पर्यटकांच्या लोंढय़ाला कारणीभूत ठरत आहे. धरण भरले की अतिरिक्त पाणी लयबद्ध पद्धतीने एका टप्प्यावरून दुसऱ्यावर, दुसऱ्यावरून तिसऱ्या टप्प्यावर ओसंडून वाहू लागते आणि पाहणाऱ्याला एकावर एक असे अनेक धबधबे पहिल्याचा आनंद मिळतो. हे टप्पे जास्त खोल नसल्यामुळे येथे भिजण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी जमते. अर्थात ही गर्दी टाळून थोडसे मागे डोंगराजवळ जायला हरकत नाही. अगदीच डोंगरधारेला लागून असलेल्या या धरणाच्या जलाशयाच्या नयनरम्य देखाव्याला सुरेख जोड लाभली आहे ती पाठीशी उभ्या असलेल्या कातळ भिंतीवरून रांगेत कोसळणाऱ्या धबधब्यांची. नजर खिळवून ठेवणारा असाच हा नजारा म्हणावा लागेल. गेल्या दोन वर्षांपासून सोशल मीडियावरून होणाऱ्या मोठ्या प्रसिद्धीमुळे सुट्टीच्या दिवशी येथे हजारोंच्या संख्येने पर्यटक जमू लागले आहेत. त्यामुळेच सुट्टीचे दिवस टाळून मध्येच एखादी खास रजा काढून येथे आवूर्जन भेट द्यायला हरकत नाही.

# खडसांबळे लेणी

अष्टविनायकातील पाली गावापासून १४ किलोमीटर अंतरावर खडसांबळे नावाचे एक छोटेसे गाव आहे. याच गावाच्या पाठीमागे डोंगरात मध्यावर एक लेणी समूह कोरलेला आहे. चहू बाजूने जंगलाने वेढलेल्या या लेण्यांना भेट द्यायची झाल्यास गावातून वाटाडय़ा घेणे आवश्यक ठरते. गावापासून लेण्यांपर्यंत पोहोचायला तासाभराची सोपी चढाई करावी लागते. पण थोडे कष्ट घेऊन पठारावर पोहोचताच येथील हिरवाईने नटलेला निसर्ग पाहून घेतलेल्या श्रमाचे चीज होते. दूर दूरवर पसरलेले हिरवे गवताच्छादीत पठार, त्यापलीकडे गुटख्यापासून ते थेट हिरडीपर्यंत (गुटखा-हिरडी ही घाटमाथ्यावरील गावे आहेत) आडवी पसरलेली सह्यधार आणि त्यावरून मुसंडी मारून वाहणारे अनेक धबधबे असा नयनरम्य देखावा निरखत पुन्हा जंगलात शिरायचे आणि थेट लेणी गाठायची.



लेण्यांच्या समोर येताच विशेष लक्ष वेधून घेतो तो येथील विस्तीर्ण सभागृह. मात्र दरड कोसळून व छत खचून त्यातील बहुतांश गुहांचा प्रवेश बंद झाला आहे. डोंगरमाथ्यावरून ओघळणारे पाणी लेणींच्या थेट पुढय़ात कोसळते. श्रावणात येथे गेल्यास या पाण्यावर पडणाऱ्या तिरप्या सूर्यकिरणांमुळे पाण्यात एकात एक गुरफटलेली अनेक इंद्रधनुष्य पाहायला मिळतात. खडसांबळे लेण्यांची सफर एका अपरिचित वारसास्थळाची भेट आणि सुगम्य जंगल भटकंती असा दुहेरी आनंद देऊन जाते.

# विवाह सोहळ्यासाठी शाही ठिकाणे

प्रत्येकाच्या आयुष्यात विवाह सोहळा हा फार महत्त्वाचा असतो. तो चांगल्या पद्धतीने आणि चांगल्या ठिकाणी करणे ही सगळ्यांची इच्छा असते. तसेच हे क्षण आयुष्यभर आठवणीत राहतात. याला अधिकच रोमँटिक करण्यासाठी निवडा पुढील शाही ठिकाणे...

## शाही राजस्थान

ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्यामुळे राजस्थान नेहमीच शाही थाटासाठी ओळखला जातो. राज पॅलेस, राम बाघ पॅलेस आमी जय महाल पॅलेस येथे लग्न सोहळा तुमच्यासाठी अविस्मरणीय ठरू शकतो. उदयपूर येथील द लेक पॅलेस हॉटेल हा आणखी सर्वोत्तम ऑप्शन असू शकतो. राजस्थानमधील जयपूर, उदयपूर आणि जोधपूर ही शहरे देशातील प्रमुख शहरांशी रस्ते मार्गाने जोडली गेली आहेत.

## ॲडव्हेंचरस अंदमान

हिरवाईने नटलेला भूप्रदेश, स्वच्छ पाण्याचा अथांग समुद्र आणि सुंदर किनारा अशी पार्श्वभूमी लग्न सोहळ्यासाठी अतिशय उत्तम ठरू शकते. अंदमान-निकोबार बेटे एक सध्या भारताती उत्तम वेडिंग डेस्टिनेशन्सपैकी एक मानले जाते. ॲडव्हेंचरची हौस असणाऱ्या कपल्स ना येथे वॉटर स्पोर्टस्चा आनंद देखील घेता येऊ शकतो. येथे तुम्ही हवाई मार्गाने तसेच समुद्रमार्गे जहाजातून जावू शकता.



## हाऊसबोट

लग्न सोहळ्यासाठी समुद्र किनारा असलेले आणखी एक ठिकाण म्हणजे केरळ. तुम्हाला शांतता अनुभवायाची तर केरळ अतिशय सुंदर आहे. कोल्लम, कोटी आणि वरका येथील बॅकवॉटरमध्ये असलेल्या हाउस बोटमध्ये लग्न समारंभ संस्मरणीय ठरू शकते. येथे बस, कार, रेल्वे आणि विमानानेही जाऊ शकता.



# मिझोराम

मिझोराम हे ईशान्येकडील सात राज्यांतील एक छोटेसे राज्य. मिझोरामची राजधानी असलेले ऐझवाल हे गुवाहाटीपासून ५०६ कि.मी., शिलाँगपासून ४५० कि.मी. आणि इम्फाळपासून ३७४ कि.मी. दूर आहे. सिलचर हे जवळचे रेल्वेस्थानक असून ते १८४ कि.मी. अंतरावर आहे. सर्व रस्ते सिलचरमार्गेच जातात. त्यामुळे रस्त्याने ऐजवाल गाठायला गुवाहाटीपासून दीड दिवस लागतो. गुवाहाटी व कोलकाता येथून विमानाने ऐझवालला येता येते.

मिझोराम हे हिरव्यागार डोंगररांगांनी व्यापलेले आहे. राज्याचे सर्वात उंच शिखर फावांगपुई (७०७५ फूट) हे म्यानमारच्या सीमेवर आहे. या डोंगररांगेला ब्ल्यू माउंटन म्हणून ओळखले जाते. राज्याची भाषा मिझो असल्याने येथील लोकांशी संपर्क साधताना भाषेची थोडी अडचण येते. मुख्य उत्पन्नाचे साधन शेती. तीही जंगल कापून काही काळासाठी करण्यात येते. येथे बांबूची लागवड मोठ्या प्रमाणात होत असल्याने दैनंदिन गरजांसाठी बांबूचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे तेथे आपल्याला घरेही बांबूचीच पाहायला मिळतील. मिझो संस्कृतीतील दहा नृत्यप्रकारांपैकी चेराव म्हणजे बांबूनृत्य पर्यटकांसाठी पर्वणी असते. ऐजवालमधील झुलॉजिकल पार्क, म्युझियम प्रेक्षणीय आहे. तेथील बडा बाजार नावाची मुख्य बाजारपेठ प्रसिद्ध आहे. इथल्या हॉटेलांत चायनीजबरोबरच भात, भाकरी, वरण हमखास मिळते.

ऐझवालपासून ८५ किमीवर प्रेक्षणीय तामदिल तलाव, १५२ किमीवर ७५० फूट उंचीचा वांटावांग धबधबा व १३३ कि.मी.वर दाम्पा अभयारण्य आहे. ऐजवालहून खुंआंगचेरा गाव, तेथील छोटे भुयार, रेईक शिखर व तेथील मिझो पर्यटन ग्राम असा एक दिवसाचा गाडीने भटकंतीचा कार्यक्रम करता येतो. मिझोरामच्या भटकंतीसाठी ऑक्टोबर ते मार्च हा कालावधी उत्तम असतो. हे सीमावर्ती राज्य असल्याने येथे प्रवेशासाठी परवाना घ्यावा लागतो. हा परवाना दिल्ली, गुवाहाटी येथे मिझोराम सरकारच्या जनसंपर्क कार्यालयांबरोबरच ऐझवाल विमानतळावर मिळतो.

# मेघालय



मेघालय हे ईशान्येकडील राज्यांतील बांगलादेशच्या सीमेला लागून असलेले एक छोटेसे राज्य. नावाप्रमाणेच मेघांचा आलय असलेले सर्वाधिक पर्जन्यमानाचे राज्य. संपूर्ण मेघालय गारो, खासी व जैतिया टेकड्यांनी व्यापलेला आहे. या वेगवेगळ्या टेकड्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या जमातीही या टेकड्यांच्याच नावाने म्हणजे गारो, खासी, जैतिया या नावाने ओळखल्या जातात. मेघालयातील बहुतांश लोकसंख्या ही या जमातींची आहे. सुमारे ३०० प्रकारचे ऑर्किड, दोन राष्ट्रीय उद्याने, अनेक प्रकारचे वन्य प्राणी यांनी समृद्ध असे हे राज्य आहे. येथील भटकंतीसाठी ऑक्टोबर ते एप्रिल हा कालावधी अनुकूल आहे. जून ते सप्टेंबर या दरम्यान येथे प्रचंड पाऊस असतो.

## शिलाँग

गुवाहाटीपासून ९० किलोमीटरवर शिलाँग हे मेघालयाच्या राजधानीचे शहर आहे. येथे सर्व शहरी सुविधा आहेत. प्रवासासाठी बस व जीप गाड्या यांची सेवा चांगली आहे. रस्तेही चांगले आहेत. शिलाँगकडे जाताना १७ किलोमीटर अलीकडे, प्रचंड मोठा असा उमियाम जलाशय आहे. हा सर्व परिसर अत्यंत रम्य आहे. शिलाँगपासून १० किलोमीटरवर शिलाँग शिखर (६४४५ फूट) आहे. येथून शिलाँग शहराचे विहंगम दृश्य पाहायला मिळते.

शहरापासून दहा- बारा किलोमीटरच्या परिसरात स्प्रेड इगल, स्वीट, एलेफंट अशा नावांचे धबधबे आहेत. शिलाँगपासून ५४ कि.मी. अंतरावर चेरापुंजी येथून हिरव्या रंगाने नटलेल्या खोल दऱ्या, मोसमाई, दैन्थलेन, नोहकेलीकाई या नावाचे व असे अनेक धबधबे व बांगलादेशचा पठारी प्रदेश नजरेस पडतो. येथून ५५ किमीवर मोंहसिराम हे आता सर्वाधिक पर्जन्यमान असणारे ठिकाण म्हणून ओळखले जाते. याच पट्ट्यात दऱ्या-खोऱ्यांमध्ये लिविंग रुट ब्रिज हे नैसर्गिक आश्चर्य खास पाहण्याजोगे आहेत. ओढे, नाले ओलांडून जाण्यासाठी असे ३५ अवाढव्य पूल या परिसरात आहेत. खासी जमातीचा नोंगक्रेम सण व गारो जमातीचा वांगाला डान्स नोव्हेंबरमध्ये तर जैतियांचा बेह देन्खलाम सण जुलैमध्ये असतो.



## हजारो भुयारे

आपल्या देशात नैसर्गिक भुयारे फक्त मेघालय राज्यात आहेत. मेघालयाच्या टेकड्यांमध्ये असलेला चुनखडीचा खडक व सर्वाधिक पर्जन्यमान या घटकांमुळे मेघालयात हजारो भुयारांची निर्मिती झाली आहे. ही भुयारं भूगर्भ शास्त्रज्ञ व इतर अभ्यासकांसाठी नंदनवन म्हणावी लागतील. साहसाची व नित्य नव्याचा वेध घेण्याची ओढ असणाऱ्यांसाठी एक आव्हानच आहे. अशा या भुयारातून पृथ्वीच्या अंतरंगाचा वेध घेत केलेल्या साहसी मार्गक्रमणाला केव्हिंग संबोधले जाते. या केव्हिंगसाठी प्रस्तरारोहणाच्या तंत्राचा तर काही ठिकाणी वॉटर डायव्हिंग तंत्राचा वापर करावा लागतो. आतापर्यंत शोध घेतलेले सर्वात लांब भुयार ३१ कि.मी. लांबीचे आहे. नैसर्गिकरित्या या गुहांमध्ये तयार झालेल्या नानाविध रचना पाहताना आपण वेगळ्याच जगात आहोत की काय असा भास होतो. चेरापुंजीत मोसमाई नावाचे भुयार आहे. या भुयारातील मार्ग योग्य त्या सुविधा करून सोपा केलेला असल्याने पर्यटकांना या भुयाराची अनुभूती घेता येते.

# पावसाळी भटकंती

पावसाळा म्हटले की डोंगर, दऱ्या पादाक्रांत करण्यात भरपूर मजा येते. हिरव्या रंगाने नटलेले डोंगर पर्यटकांना खुणावत असतात. वीकेण्डला अशा पिकनिकची मजा लुटली की संपूर्ण आठवडा एकदम मस्त मूडमध्ये जातो. यासाठीच काही पर्यटनस्थळे..

## भिवगड

कर्जतपासून आठ किलोमीटरवरील गौरकामत गावाजवळ भिवगड/भीमगड नावाचा एक छोटा किल्ला आहे. अवघ्या अर्ध्या तासाच्या सोप्या चढाईने माथा गाठता येणाऱ्या या किल्ल्यावर पाण्याची काही टाकी, दगडी पायऱ्या आणि वाड्याचे चौथरेवगळता इतर वास्तू जवळजवळ नामशेष झाल्या आहेत. मात्र, गड-माथ्यावरून दिसणारा सभोवतालचा हिरवाकंच देखावा नजर खिळवून ठेवतो. हिरव्यागार शेतात डोक्यावर रंगीबेरंगी इरली घेऊन राबणारे शेतकरी, पाठीमागच्या ढाकच्या डोंगरावरील घनदाट वनराई, त्यातून कोसळणाऱ्या धबधब्यांच्या पांढऱ्या रेषा आणि अंग मोहरून टाकणारा गार वारा हे सारे अनुभवण्यासारखे आहे. हिरवाईच्या शौकिनांनी पावसाळ्यात आवर्जून भेट द्यावी असे हे ठिकाण. येथून जवळच एका खिंडीत मोठा धबधबा आहे. तास-दोन तासात गडफेरी आटोपून धबधब्यावर चिंब भिजण्याची मजा लुटता येऊ शकते.

## काळदुर्ग

माहीम-केळवे डोंगर रांगेतील पालघरजवळील एक छोटासा किल्ला म्हणजे काळदुर्ग. पालघर-मनोर गाडी रस्त्यादरम्यान लागणाऱ्या वाघोबाच्या खिंडीपासून सुरू होणारा घडीव पायरस्ता आपल्याला तासाभराच्या सोप्या चढाईने काळदुर्गावर घेऊन जातो. जंगल भटकंतीचा आनंद लुटत टप्प्याटप्प्याने चढणाऱ्या पायवाटेने डोंगरमाथा गाठल्यावर दृष्टीस पडणारा सभोवतालचा रम्य देखावा डोंगर चढाईचा शीण कुठल्या कुठे पळवून लावतो. सूर्या नदीचे विस्तीर्ण खोरे, सूर्या-वैतरणा संगम, क्षितिजाशी अरबी समुद्राची निळाई तर पलीकडे तांदूळवाडी किल्ल्यापर्यंत नागमोडी पसरलेली डोंगररांग. शहरी जीवनाचा विसर पाडायला लावणारे निसर्गसौंदर्य. वाघोबाच्या खिंडीतून येणारे वाहतुकीचे आवाजच काय ते आपण शहरात असल्याची जाणीव करून देतात. माथ्याच्या छोटय़ाशा विस्तारात ३-४ पाण्याची टाकी पाहायला मिळतात. बाकी अवशेष तसे फारसे काही शिल्लक नाहीत.



## खिरेश्वरचे नागेश्वर मंदिर

खळाळत वाहणारे असंख्य झरे, डोंगरदऱ्यात खोलवर उतरत जाणारे ढगांचे पुंजके, त्याआडून डोकावणारे सह्याद्रीचे कडे असे नजरेला भुरळ पडणारे निसर्गसौंदर्य भटक्यांना पावसाळ्यात माळशेज घाटात हमखास खेचून आणते. घाटातील गर्दी टाळून आवर्जून भेट द्यावे असे एक देखणे वास्तुशिल्प येथील खिरेश्वर गावी दडलेले आहे. हरिश्चंद्र गडाच्या पायथ्याचे गाव म्हणजे खिरेश्वर. घाट चढून आल्यावर काही अंतरावर लागणाऱ्या खुबी फाट्यावरून डावीकडे (मुंबईकडून नगरकडे जाताना) जाणाऱ्या कच्च्या रस्त्याने ४ किलोमीटरच्या अंतरावर वसलेले हे छोटेसे गाव. ही कच्ची सडक म्हणजे धरणाचा बंधारा होय. त्यामुळे उजवीकडे क्षितिजापर्यंत पसरलेल्या निळाईत आजूबाजूच्या डोंगरांचे पडलेले प्रतिबिंब पाहत असता आपण गावात कधी पोहोचतो हे समजतच नाही.



## मोहिली धबधबा

### कसे जाल ?

नाशिकहून कल्याणमार्गे कर्जतला जावे. कर्जत स्थानकावरून श्रीराम पुलावरून रिक्षाने मोहिलीकडे जाता येते. स्वतःचे वाहन असेल तर अधिक सोयीचे .

पावसाळ्यात उंच डोंगरमाथ्यावरून कोसळणारे पांढरेशुभ्र धबधबे पाहणे हे पर्यटकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो. कर्जत तालुक्याला निसर्गाने मोहिली धबधबा हे देणे दिले आहे. मोहिली धबधबा हा कर्जत पासून ६ ते ७ कि.मी. लांब आहे. उल्हास नदी पार करून प्रत्यक्ष मोहिलीत प्रवेश होतो. डोंगरावरून भिरभिरणारा वारा , हिरवीगार वनराई, तेथून दिसणारा आजूबाजूचा निसर्ग असे नयनरम्य दृश्य डोळ्यांत साठवून ठेवावे असे वाटते . डोंगरमाथ्यावरून मुंबई-पुणे रेल्वेचा रस्ताही दिसतो . धबधब्याजवळ पर्यटकांची हॉटेल्स आहेत. मोहिली धबध्ब्याजवळ थंड वातावरणात गरमगरम वाफाळता चहा आणि मक्याची कणसे खाण्याची मजाच काही औरच आहे असे इथे येणारे पर्यटक सांगतात. यापुढे ७-८ किलोमीटर दूर गेल्यास कोंडाणा परिसरातही अनेक धबधबे आहेत .

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# शिवराज्याभिषेकानिमित्त आयएएस विद्यार्थ्यांचा सत्कार स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलन पर्यावरण संमेलन



येत्या 6 जून रोजी असलेल्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त यावर्षी आयएएस च्या परीक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार तसेच स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संमेलन व पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व उपक्रम अमरावती शहराला लागून असलेल्या वलगाव येथील भव्य अशा व आठ एकरात असणाऱ्या सिकची रिसॉर्ट व कृषी भवन येथे संपन्न होणार आहेत. श्री प्रेम किशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट व डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी यांनी संयुक्तपणे मिशन आयएएस अंतर्गत या सर्व कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

गेल्या 25 वर्षापासून मिशन आयएएसतर्फे त्या त्या वर्षी आयएएस झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. आतापर्यंत मिशनने सुप्रसिद्ध आय ए एस अधिकारी श्री जे पी डांगे रत्नाकर गायकवाड एकनाथ डवळे तुकाराम मुंढे डॉ.श्रीकर परदेशी श्री विकास खारगे अभिनय कुंभार डॉ.सुधीरकुमार गोयल दिनेश वाघमारे मधुकर कोकाटे किशोर गजभिये रवींद्र जाधव पुरुषोत्तम भापकर ओमप्रकाश गुप्ता मनीषा वर्मा मिलिंद म्हैसकर मनीषा म्हैसकर राहुल रंजन महिवाल डी आर बनसोड शेखर गायकवाड कौस्तुभ दिवेगावकर आस्तिक पांडे रामराव घाडगे बाबासाहेब कंगाले दिलीप स्वामी संदीप राठोड दिलीप स्वामी हेमंत कोठीकर रवींद्र ठाकरे अश्विनी जोशी अरुणकुमार डोंगरे सारंग वानखडे सृष्टी देशमुख संदीप राठोड राहुल रेखावार प्रशांत होळकर अमृतेश औरंगाबादकर सेना अग्रवाल लक्ष्मीनारायण मिश्रा प्रेरणा देशभ्रतार दीपक म्हैसेकर आस्तिक पांडे उदय चौधरी विठ्ठल जाधव स्वप्निल वानखडे आशिष ठाकरे मनोज महाजन भाग्यश्री बानाईत प्रशांत रोडे, प्रशांत होळकर हिरा लाल आशिष पाटील विष्णू आवटी मानसी पाटील मिताली शेठी कविता पाटील मयूर सूर्यवंशी भुवनेश पाटील आणि गतवर्षी आयएएस झालेले श्री रजत पत्रे अभिदा शेख जयकुमार आडे अश्विनी धामणकर पंकज पाटील अभिनव देशमुख नम्रता ठाकरे मोहिनी खंडारे अभय देशमुख यांचा भव्य सत्कार आयोजित केलेला आहे . यावर्षी आयएएसचा निकाल लागल्यानंतर 24 मे 20260 ला आयएएसची पूर्व परीक्षा आल्यामुळे हे सत्कार शिवराज्याभिषेक दिनानिमित्त जून महिन्यात आयोजित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर विदर्भातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलांना सविस्तर मार्गदर्शन मिळावे यासाठी चौथे स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संमेलनाचे देखील आयोजन करण्यात आले आहे .

पाच जूनला पर्यावरण दिन असल्यामुळे पर्यावरण पूरक निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा काव्य स्पर्धा तसेच भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ज्यांना या उपक्रमात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी अधिक माहितीसाठी डॉ.पंजाबराव देशमुख आय ए एस च्या सहसंचालिका प्रा पल्लवी नरेशचंद्र काठोळे 9823294326 किंवा सिकची चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक श्री सचिन माळकर 787571 3975 यांच्याशी या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मिशन आयएएस या संस्थेचे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी केले आहे.

**■ प्रा डॉ. नरेशचंद्र काठोळे संचालक मिशन आयएएस अमरावती कॅम्प 9890967003**

# महिला आरक्षणावरून लोकसभेत गदारोळ

## घटनादुरुस्ती विधेयक फेटाळले, विरोधकांकडून मतदारसंघ पुनर्रचना प्रस्तावाला कडाडून विरोध

**■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी केंद्र सरकारने लोकसभेत मांडलेल्या घटनादुरुस्ती विधेयकाला शुक्रवारी मोठा धक्का बसला. सीमांकन (Delimitation) प्रस्तावावरून विरोधकांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे या विधेयकाला आवश्यक असलेले दोन तृतीयांश बहुमत मिळू शकले नाही आणि अखेर हे विधेयक फेटाळले गेले.

लोकसभा अध्यक्ष (ओम बिर्ला) यांनी मतदानाचा निकाल जाहीर करताना सांगितले की, विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली, तर २३० सदस्यांनी विरोधात मतदान केले. घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होण्यासाठी आवश्यक असलेले बहुमत न मिळाल्याने सरकारला पराभवाचा सामना करावा लागला.

### सरकारचा विरोधकांवर जोरदार हल्ला

दीर्घ चर्चेनंतर उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री (अमित शाह) यांनी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक आणि समाजवादी पक्षावर जोरदार टीका केली. "महिलांना त्यांचा हक्क देणाऱ्या विधेयकाचा मार्ग विरोधकांनी रोखला आहे. २०२९ च्या निवडणुकीत देशातील महिला याचा हिशोब चुकता करतील," असा इशारा त्यांनी दिला.

विरोधी पक्षांनी स्पष्ट केले की, ते महिला आरक्षणाच्या विरोधात नाहीत; मात्र आरक्षणाला सीमांकन आणि जनगणनेशी जोडण्याच्या अटीला त्यांचा विरोध आहे. काँग्रेस नेते Rahul Gandhi (राहुल गांधी) म्हणाले, "हे विधेयक महिला सक्षमीकरणासाठी नसून देशाचा राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे. आम्ही संविधानावरील हा हल्ला रोखला." काँग्रेसच्या नेत्या (प्रियांका गांधी) यांनी सरकारवर टीका करत म्हटले, "ज्यांनी हातरस, उन्नाव आणि मणिपूरसारख्या घटनांमध्ये काहीच केले नाही, ते आज नारीशक्तीच्या गप्पा मारत आहेत. सीमांकनाशी आरक्षण जोडणे आम्हाला मान्य नाही." समाजवादी पक्षाचे नेते (अखिलेश यादव) यांनीही स्पष्ट केले, "आम्ही आरक्षणाच्या बाजूने आहोत, पण सीमांकन प्रक्रियेच्या पद्धतीवर आमचा आक्षेप आहे."

# अलका कुबल यांच्या हस्ते प्रा. काठोळे यांचा सत्कार



मिशन आयएएसचे काम हे अभूतपूर्व आहे. फक्त एक रुपयामध्ये स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण देणारी ही संस्था महाराष्ट्रातील अनेक युवकांना घडवित आहे. मिशनचे संचालक प्रा.डा. नरेशचंद्र काठोळे हे याही वयामध्ये या मिशनसाठी अहोरात्र काम करीत आहेत हे खरोखरच माझ्यासाठी अभिमानाची व गौरवाची गोष्ट आहे म्हणून मी आपल्या सर्वांच्या साक्षीने त्यांना वंदन करते हे उद्गार आहेत मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री व माहेरची साडी या चित्रपटांमुळे महाराष्ट्रातल्या घराघरात पोहोचलेल्या श्रीमती अलका कुबल यांचे. जीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. त्या नुसतं बोलल्यास नाही तर खचाखच भरलेल्या सभागृहामध्ये त्यांनी वाकून मिशन आय ए एसचे संचालक प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे यांना यांना वाकून नमस्कार केला.

नवी मुंबई येथील नेरूळ भागात कार्यरत असणाऱ्या श्री गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्टच्या माई बाळ साधन च्या वार्षिक कार्यक्रमात श्रीमती अलका कुबल यांना बोलाविण्यात आले होते. जीवन गौरव पुरस्कार वितरित करण्याअगोदर मिशन आयएएसचे संचालक प्रा.डॉ.नरेशचंद्र काठोळे यांचा थोडक्यात जीवनपट स्क्रीनवर दाखविण्यात आला. त्या पाहून श्रीमती अलका कुबल ह्या इतक्या भारावल्या की त्यांनी मागचा पुढचा विचार न करता सरळ वाकून काठोळे सरांना नमस्कार केला.

नवी मुंबईतील आगरी कोळी भवन नागरिकांनी खच्च भरले होते. एवढी मोठे अभिनेत्री एका व्यक्तीच्या पाया पडते ही खरोखरच फार मोठी गोष्ट होती. पण अलका कुबल यांनी वाकून आपली विनयशीलता दाखवून दिली आहे. नवी मुंबई मधील आगरी कोळी सभागृहात संपन्न झालेल्या या 28 व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध उद्योजक दीपक तायडे प्रवीण वाकडे संदेश असरेकर दीपक कापसे उपायुक्त मेहबूब कासार दीपक वाळके यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

माई बाल सदन ही गेल्या 28 वर्षांपासून कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान न घेता आणि मुला-मुलींचे संगोपन शिक्षण हे लोक वर्गणीतून करते .आज संस्थेचे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या पदावर संपूर्ण भारतामध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या वार्षिक कार्यक्रमात हा जीवन गौरव पुरस्कार वितरण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

श्रीमती अलका कुबल यांनी मिशन आय ए एस.च्या कार्याची दखल घेऊन मी अमरावतीला आली तर तुमच्या घरी जरूर येईल असे आश्वासन देखील प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांना दिले. मिशन आयएएसच्या रौप्य महोत्सवामध्ये श्रीमती अलका कुबल यांना निमंत्रित करण्यात आले असून त्यांनी ते निमंत्रण स्वीकारले आहे.

याप्रसंगी प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी माई बाल संगोपनच्या अनाथ व गरीब विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे विनामूल्य प्रशिक्षण देण्याचा संकल्प जाहीर केला. याप्रसंगी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता संस्थेचे अध्यक्ष श्री बाळासाहेब देशमुख यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. जीवन गौरव पुरस्काराचे वितरण झाल्यानंतर संस्थेतर्फे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या पूर्ण कार्यक्रमाला रसिकांची भरगच्च उपस्थिती होती

# अक्षय तृतीयेपूर्वी सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण; सोने 1700 तर चांदी 5700 रुपयांनी स्वस्त

मागणीच्या अभावामुळे आणि युद्ध निवळण्याची शक्यता वाढल्यामुळे साने व चांदीच्या घरात बरीच घट नोंदली केली. शुक्रवारी सोन्याचा दर 1,700 रुपयानी म्हणजे 1.01 टक्क्याने कमी होऊन 1 लाख 56 हजार 200 रुपये प्रति दहा ग्रॅम या पातळीवर गेला.

चांदीचा दरही 5,700 रुपयांनी म्हणजे 2.2 टक्क्यांनी कोसळून 2 लाख 53 हजार रुपये प्रति किलो या पातळीवर गेला. युद्ध संपण्याच्या शक्यतेमुळे सोने आणि चांदीची मागणी कमी झाली आहे. मात्र परिस्थिती अजूनही खात्रीने पूर्वपदावर आलेले नाही. अशा परिस्थितीत गुंतवणूकदार सावध राहून व्यवहार करण्याची शक्यता कायम आहे.



# सोनाई कारखान्याचा 2700 रु प्रमाणे 1 ते 15 फेब्रुवारी 2026 या कालावधीत गेलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा पहिला हप्ता महेश बँकेत वर्ग!

**■ परळी वैजनाथ प्रतिनिधी**

सोनाई अँग्रो कारखान्याचे चेअरमन प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचा 2700 रुपये प्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा पहिला हप्ता दिनांक 1 ते 15 फेब्रुवारी 2026 या कालावधीत कारखान्यास ऊस गेलेल्या शेतकऱ्यांचा ऊसाचा हप्ता महेश को-ऑपरेटिव्ह बँक शाखा परळी वैजनाथ येथे वर्ग करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन आत्माराम कराड व संचालक प्रा. विजय मुंडे दिली आहे. कारखाना सुरू झाल्यापासून 15 फेब्रुवारी महिन्याच्या तारखेपर्यंत शेतकऱ्यांच्या ऊसाची बीले बँकेत वर्ग करण्यात आली आहेत त्यामुळे परिसरातील शेतकरी बांधव आनंद व्यक्त करत आहेत .तरी ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपली रक्कम महेश को-ऑपरेटिव्ह बँकेतून घेऊन जावी असे कारखान्याच्या वतीने कळविण्यात आले आहे.



# महिला आरक्षणावरून लोकसभेत गदारोळ

## घटनादुरुस्ती विधेयक फेटाळले, विरोधकांकडून मतदारसंघ पुनर्रचना प्रस्तावाला कडाडून विरोध

**■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी केंद्र सरकारने लोकसभेत मांडलेल्या घटनादुरुस्ती विधेयकाला शुक्रवारी मोठा धक्का बसला. सीमांकन (Delimitation) प्रस्तावावरून विरोधकांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे या विधेयकाला आवश्यक असलेले दोन तृतीयांश बहुमत मिळू शकले नाही आणि अखेर हे विधेयक फेटाळले गेले.

लोकसभा अध्यक्ष (ओम बिर्ला) यांनी मतदानाचा निकाल जाहीर करताना सांगितले की, विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली, तर २३० सदस्यांनी विरोधात मतदान केले. घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होण्यासाठी आवश्यक असलेले बहुमत न मिळाल्याने सरकारला पराभवाचा सामना करावा लागला.

### सरकारचा विरोधकांवर जोरदार हल्ला

दीर्घ चर्चेनंतर उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री (अमित शाह) यांनी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक आणि समाजवादी पक्षावर जोरदार टीका केली.

"महिलांना त्यांचा हक्क देणाऱ्या विधेयकाचा मार्ग विरोधकांनी रोखला आहे. २०२९ च्या निवडणुकीत देशातील महिला याचा हिशोब चुकता करतील," असा इशारा त्यांनी दिला. विरोधी पक्षांनी स्पष्ट केले की, ते महिला आरक्षणाच्या विरोधात नाहीत; मात्र आरक्षणाला सीमांकन आणि जनगणनेशी जोडण्याच्या अटीला त्यांचा विरोध आहे. काँग्रेस नेते Rahul Gandhi (राहुल गांधी) म्हणाले, "हे विधेयक महिला सक्षमीकरणासाठी नसून देशाचा राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे. आम्ही संविधानावरील हा हल्ला रोखला."

काँग्रेसच्या नेत्या (प्रियांका गांधी) यांनी सरकारवर टीका करत म्हटले, "ज्यांनी हातरस, उन्नाव आणि मणिपूरसारख्या घटनांमध्ये काहीच केले नाही, ते आज नारीशक्तीच्या गप्पा मारत आहेत. सीमांकनाशी आरक्षण जोडणे आम्हाला मान्य नाही." समाजवादी पक्षाचे नेते (अखिलेश यादव) यांनीही स्पष्ट केले, "आम्ही आरक्षणाच्या बाजूने आहोत, पण सीमांकन प्रक्रियेच्या पद्धतीवर आमचा आक्षेप आहे."




# पेरले ते उगवले

## पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली

इस्लामाबादमधील एका शिया पंथाच्या दर्ग्यानजीक एका आत्मघातकी मानवी बाँबने स्वतःला उडवले. या स्फोटात ३१ लोक ठार तर १६९ जण जखमी झाले. तरलाई इमामबर्ग येथे हा शक्तीशाली बाँबस्फोट झाला.आता पाकिस्तानने अफगाणिस्तानवर आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. पाकिस्तानचे म्हणणे आहे, की अफगाणिस्तानच्या दहशतवाद्यांनी स्फोट घडवला पण भारताने त्यांना आर्थिक मदत केली. पाकचा हा कुटील कांगावा आहे हे सहज लक्षात येते. कारण भारत कुणाच्याही देशात ढवळाढवळ करत नाही आणि पाकच्या उलट्या काळजाच्या देशात तो असे उद्योग करण्याची शक्यता जवळपास नाही. अद्याप कोणत्याही गटाने स्फोटाची जबाबदारी स्वीकारली नाही. तरीही पाकने अफगाणिस्तान आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. मुळात पाकने आतापर्यंत दहशतवाद्यांना पोसण्याचे काम केले. तो दहशतवाद्यांचा सरपरस्त आहे. त्यामुळे पाकचे औषध त्यालाच पाजण्यात आले. कारण पाकने आतापर्यंत हेच केले. त्याने निरपराध भारतीय नागरिकांना ठार केले. तेही शेकड्यांनी. २००८ चा बाँम्बहल्ला आणि दहशतवाद्यांचा धूडगूस आणि भारतातील ट्रेनमध्ये घडवलेले स्फोट मालिका अशी कितीतरी उदाहरणे आहे. त्यामुळे पाकवर असा दशहतवादी हल्ला झाला तर त्याबद्दल फारसे वाईट वाटण्याचे काही कारण नाही.

पाकला सुसाईड बाँबहल्ले नवे नाही. तीन महिन्यांपूर्वी इस्लामाबाद येथे अशाच एका सुसाईड बाँबरने हल्ला केला होता. या हल्ल्याचा पाकचे अध्यक्ष आणि पंतप्रधान यांनी निषेध केला. पण त्यात काही अर्थ नाही. कारण आतापर्यंत पाकने जे पेरले तेच उगवले. त्यातही पाकचा खोटारडेपणा असा, की भारतावर आरोप करताना पाक हे विसरला, की भारत दुसऱ्या देशात असे उद्योग करत नसतो. हे पाकचे काम आहे. पाकिस्तानचा मित्र म्हणून चीनने या हल्ल्याचा निषेध केला. कोणताही हल्ला होणे आणि त्यात निरपराध नागरिकांचे बळी जाणे हे नेहमीच वाईट असते. पण पाकने भारतावर पूर्वी असेच हल्ले केलेत. पेहलगाम येथे निरपराध हिंदू कुटुंबियांना पाकच्या दहशतवाद्यांनी वेचून ठार केले. त्यामुळे पाकने आता कितीही व्याख्यान झोडले तरीही पाकचे कृत्य नापाक आहे हे जगापासून लपून राहिलेले नाही. पाकचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले, की भारताने अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांना पैशाची मदत केली आणि त्यामुळेच हा हल्ला झाला. पण त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाही. मागेही भारतातील हल्ले पाक पुरस्कृत होते. पाकने चीनच्या मदतीने मसूद अझर याला अनेक वर्षे दहशतवादी घोषित करण्यास अडथळे आणले. त्यात चीनने आपला व्हेटो अधिकार वापरून मसूदला दहशतवादी घोषित करू दिले नाही. भारताने कित्येक वेळा पाककडे अझरला आपल्या हवाली करण्याची मागणी केली होती. पण तसे झाले नाही. तोच पाकिस्तान आता भारतावर आरोप करत आहे. खरी वस्तुस्थिती अशी आहे,



की आपल्या सामाजिक रचनेला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याऐवजी पाकिस्तान भारत किंवा अन्य एखाद्या देशाविरोधात असे कट रचल्याचा आरोप करतात पण त्यात तथ्य नसते. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात शाब्दिक युद्ध सुरु झाले. कारण पाकचा आरोप निराधार आहे. हे भारताच्य संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले असून पाकने स्वतःची सुरक्षा यंत्रणा तपासावी आणि त्यातील कमतरता दूर कराव्यात असा सल्ला दिला. पाकिस्तानी सरकार आणि मीडिया नेहमीच असे बेजबाबदार आणि हास्यास्पद आरोप कुठल्याही पुराव्याशिवाय करतात आणि हा प्रकार त्यातलाच आहे.

पाक हा नेहमीच भारत तर कधी अफगाणिस्तानवर आरोप करतो. पाकवर मृतांच्या कुटुंबियाना उत्तरे देण्याची जबाबदारी वाढत आहे आणि त्यापासून आपली सुटका करून घेण्यासाठी पाक असे डाव आखतो. इस्लामाबादमधील घटनेने केवळ देशातील प्राणघातक सुरक्षा त्रुटी उघड केल्या नाहीत तर प्रादेशिक तणावही वाढवला आहे. पाकिस्तानने दहशतवाद्यांशी लढण्यात आपण शून्य प्रगती केल्याचे दाखवून दिले. पण इस्लामाबादमधील हल्ल्याने त्यांची ही प्रगती किती नाजूक अवस्थेत आहे हे लक्षात आणून दिले. आता इस्लामिक स्टेटने या भीषण हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आणि २००८ मध्ये झालेल्या मॅरियट हॉटेलच्या बाँबस्फोटानंतर हा हल्ला इस्लामाबादेतील सर्वात भीषण हल्ला असल्याचे म्हटले आहे. पाकने चार संशयितांना अटक केली आहे. पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. हाय प्रोफाईल हल्ले करण्याची त्यांची क्षमता कायम आहे. त्यांची पाळेमुळे सीरियाच नव्हे तर अगदी ऑस्ट्रेलियापर्यंत पसरली आहेत आणि नुकताच त्यांनी त्या देशात भीषण हल्ला घडवून १५ लोकांना ठार केले होते. गेल्या काही वर्षात पाक अफगाणिस्तान सीमेवर वाढत्या दहशतवादाचा सामना करावा लागला असला तरीही राजधानी इस्लामाबादमध्ये असा हल्ला होणे ही क्वचितच घडणारी बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने या हल्ल्याचा निषेध केला असून त्यांनी म्हटले आहे, की युद्ध गुन्ह्यांत याचा समावेश होऊ शकतो. भारताने म्हटले आहे, की पाक स्वतःच्या देशांतील सामाजिक चौकटीतील समस्या सोडवण्याऐवजी इतरांवर म्हणजे भारतावर त्याचा दोष ढकलत आहे हे अत्यंत वाईट आणि अशोभनीय आहे. शिया आणि सुन्नी मुस्लिम यांच्यात पंथीय हिंसाचार आणि वैर सर्वश्रुत आहे. त्यामुळे या शिया दर्ग्यावर हल्ला करण्यात आला आणि आयसिसच्या तत्वानुसार हे योग्य आहे. याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे शिया जमात ही आयसिसविरोधात लढण्यासाठी मनुष्यबळ पुरवते आणि हा हल्ला म्हणजे प्रत्युत्तर म्हणून हल्ला होता. राजधानीत आपण दहशतवाद पेरू शकतो आणि आयसिसची क्षमता राजधानीतही हल्ले करण्याची आहे हे दाखवून देण्यासाठी हा हल्ला होता असेही मानण्यात येते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शनिवार 18 एप्रिल 2026



# ममदापूर येथील समाधान शिबिरात अनेकांना विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ

## समाधान शिबिरातून जनतेचे समाधान झाले पाहिजे

## पंधरा दिवसात पन्नास कोटीच्या शेत रस्त्याची कामे सुरू होणार आ. रमेशअप्पा कराड

**लातूर | प्रतिनिधी**

देशाची यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि विकास पुरुष राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या या योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होत असून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या समाधान शिबिरातून जनतेच्या अडीअडचणी, तक्रारी, प्रश्नांची सोडवणूक करून विविध योजनेचा लाभ देऊन सर्वसामान्य जनतेला समाधान द्यावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर तालुक्यातील मौजे ममदापूर येथे कासारखेडा मंडळाच्या आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी झाले. याप्रसंगी तहसिलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, भाजपा मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, शिव पाणंद रस्ता समिती सदस्य सुरज शिंदे, अनिल भिसे, दिपक वांगस्कर, गोविंद नरहरे, विजयकुमार मलवाडे हनुमंत गव्हाणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी विविध गावचे सरपंच, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी सोडण्यासाठी समाधान शिबिराचे आयोजन असून याचा निश्चितपणे अनेकांना लाभ मिळेल, फायदा होईल असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी क्रांतिकारी निर्णय घेऊन मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली. या योजनेतून लातूर ग्रामीण मतदार संघात जवळपास ५० कोटी रुपये खर्चाच्या पावणे चारशे किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम पहिल्या टप्प्यात पंधरा दिवसात सुरू होऊन पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील. येत्या दोन वर्षात लातूर ग्रामीण मतदार संघातील एकही शिवरस्ता शिल्लक राहणार नाही असे बोलून दाखवले.

प्रत्येक गावागावात शिव रस्त्याची कामे हाती घेतली जाणार असल्याने एकही रस्ता अतिक्रमित राहणार नाही सर्व रस्ते मोकळे




करावे वेळप्रसंगी कायदेशीर कार्यवाही करावी अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देऊन आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, कबाले नसल्यामुळे अनेकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नव्हता या पुढील काळात एकही पात्र लाभार्थी घरकुला पासून वंचित राहणार नाही आणि कबाल्याचा प्रलंबित प्रश्न शिल्लक ठेवणार नाही अशी माहिती देऊन प्रशासन जनतेच्या दारी शासनाची संकल्पना अत्यंत प्रभावीपणे राबविल्याबद्दल तहसिलदार आणि गटविकास अधिकारी यांचे आ. कराड यांनी कौतुक केले.

जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंखे यांनी आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून मतदार संघात विकासाची मोठी घोडदौड सुरू असल्याचे सांगून भातांगळी गटातील प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणात निधी देऊन विकासाला गती दिली असल्याचे बोलून दाखविले. प्रारंभी तहसिलदार सौदागर तांदळे यांनी आपल्या प्रास्ताविकातून शासनाच्या विविध योजनाची माहिती देऊन समाधान शिबिरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलवर आपल्या अडीअडचणी मांडून त्या सोडवून घ्याव्यात असे बोलून दाखविले.

ममदापूर येथील समाधान शिबिरात घरकुलासाठी वाळू वाटप, स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह अनुदान, लेक लाडकी योजनेच्या हप्त्याचे वाटप, ट्रॅक्टर वाटप, संगायो पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, लेक लाडकी योजनेचा हप्ता, लखपती दीदी योजनेचे पत्र, दुधाळ गट, बेबी केअर किट, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड, गाव नकाशे यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे व प्रत्यक्ष लाभाचे वाटप करण्यात आले. शेवटी मंडळ अधिकारी महेश हिप्परगे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास भाजपाचे चंद्रकांत पासमे, सुरेश पाटील, आदिनाथ मुळे, सुरेखा पुरी, मारुती शिंदे, रुपेश काळे, संजय ठाकूर, सचिन साबदे, सतिश बिराजदार, ज्ञानोबा शेळके, पुंडलिक बेंबडे, आत्माराम जाधव, संजय सावंत, मुकुंद केसरे, अहमद शेख, सोमनाथ वाघमारे यांच्यासह महसूल मंडळातील जवळपास सर्वच गावातील नागरिक, महिला पुरुष मोठ्या संख्येने होते. कार्यक्रम स्थळी आगमन होतात आ. कराड यांचे शाळकरी विद्यार्थ्यांनी लेझीम आणि विविध वाजंत्रीच्या गजरात जोरदार स्वागत केले.

# पोषण आहार, महिला व मुलींसाठी वन औषधींच्या उपयोगांवर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न



**सिरसाळा (प्रतिनिधी)**

श्री पंडितगुरू पार्डिकर महाविद्यालय, सिरसाळा, ग्लोबल विकास ट्रस्ट, सिरसाळा तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व नॅक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ 'पोषण पंधरवडा' निमित्त महिला व मुलींसाठी "वनऔषधींचे आरोग्यासाठी फायदे व वापर" या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आनंत जाधव होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. पंढरीनाथ पवार यांची उपस्थिती लाभली. प्रमुख अतिथी म्हणून नाथ हॉस्पिटलचे डॉ. पवार पंढरीनाथ, प्रा. डॉ. विक्रम धन्वे, प्रा. डॉ. उषा माने, प्रा. डॉ. अरुणा वाळके आणि प्रा. स्वाती देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन वैशाली गायके (ग्लोबल विकास ट्रस्ट) यांनी केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. डॉ. अरुणा वाळके यांनी केली. त्यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या 'नक्षत्र बागे'ची माहिती देत त्या ठिकाणी असलेल्या विविध औषधी वनस्पतींची ओळख महिलांना करून देण्याचा हेतू स्पष्ट केला. कुटुंबाला आजारांपासून दूर ठेवण्यासाठी वनौषधींचे महत्त्व अधोरेखित केले.

विद्यार्थिनी मयुरी सलगर हिने आपल्या मनोगतात नक्षत्र बाग व किचन गार्डनमधील विविध वनस्पतींबाबत माहिती दिली. तिने केवडा, वैजयंती, इन्सुलिन वनस्पती, काळी हळद, पुदिना, पारिजातक, मिरची यांसारख्या वनस्पतींचे आरोग्यदायी उपयोग स्पष्ट केले.

मार्गदर्शक डॉ. पंढरीनाथ पवार यांनी आपल्या व्याख्यानात मानव आणि निसर्ग यांच्यातील नातेसंबंध स्पष्ट करत "आपण पंचमहाभूतांचा भाग आहोत" असे सांगितले. प्रत्येक वनस्पती औषधी असून त्याचा योग्य अभ्यास म्हणजेच आयुर्वेद असल्याचे त्यांनी नमूद केले. तुळस, गुळवेल (अमृता), कोरफड, पुदिना, कडीपत्ता, मेथी, शेवगा, नागेलीची पाने यांसारख्या वनौषधींचे विविध आरोग्यदायी उपयोग त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. तसेच काही वनस्पती विषारी असल्या तरी योग्य वापर केल्यास त्या औषधी ठरतात, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

प्रात्यक्षिक सत्रात वैशाली गायके यांनी विविध वनौषधींचा प्रत्यक्ष वापर दाखवून महिलांना उपयुक्त माहिती दिली. घरच्या घरी उपलब्ध असलेल्या वनस्पतींच्या माध्यमातून आरोग्य कसे जपता येते, याचे मार्गदर्शन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. आनंत जाधव यांनी "माता आणि माती" यांचे जीवनातील महत्त्व अधोरेखित करत आरोग्य आणि परंपरेतील ज्ञान जपण्याची गरज व्यक्त केली. संकुचित होत चाललेल्या पारंपरिक ज्ञानपरंपरेचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली गायके यांनी केले, तर प्रा. स्वाती देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास २० पेक्षा अधिक विद्यार्थिनी व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# रूटी पिंपरीत दिवसाढवळ्या थरार; शेतात काम करणाऱ्या महिलेवर झटापट करून सोन्याचे दागिने लंपास

**आष्टी प्रतिनिधी:**

आष्टी तालुक्यात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असतानाच रूटी पिंपरी येथे दिवसाढवळ्या सकाळी 11:00 वा. घडलेल्या धक्कादायक प्रकाराने खळबळ उडाली आहे. शेतात काम करत असलेल्या महिलेवर चार अज्ञातांनी हल्ला करून तिचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने लंपास केल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रूटी पिंपरी येथील रहिवासी राजू गोल्हार यांची पत्नी शेतात नेहमीप्रमाणे काम करत असताना दोन मोटारसायकलवरून चार अज्ञात इसम तोंड बांधून तेथे आले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे महिला घाबरून गेली असताना आरोपींनी तिला खाली पाडले. त्यापैकी दोघांनी तिचे हातपाय घट्ट पकडले, तर उर्वरित दोघांनी धारदार चाकूचा धाक दाखवत अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने ओरबाडून घेतले. घटनेदरम्यान महिलेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपींच्या धमकीमुळे ती असहाय्य ठरली. काही क्षणातच आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. दिवसाढवळ्या घडलेल्या या धाडसी चोरीमुळे रूटी गावासह परिसरातील वस्त्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, आष्टी तालुक्यात मागील काही महिन्यांपासून सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीच्या घटना सातत्याने वाढत आहेत. दोन महिन्यांपूर्वी आष्टी शहरात एका महिलेला मोटारसायकलने धडक देऊन खाली पाडून तिचे दागिने लंपास केल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा अशाच स्वरूपाचा प्रकार घडल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या घटनेप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहे. नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन आष्टी पोलिसांकडून करण्यात आले आहे. दरम्यान, परिसरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे पोलीस प्रशासनाने गस्त वाढवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अभ्यास, संघर्ष आणि जिद्दीनेच घडते यशस्वी व्यक्तिमत्त्व : प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर

**सिरसाळा | प्रतिनिधी**

येथील श्री पंडितगुरु पार्डिकर महाविद्यालय, सिरसाळा, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. के. पाटील होते, तर श्री योगेश कदम यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात डॉ. हरिभाऊ कदम, प्रा. डॉ. विक्रम धन्वे, प्रा. डॉ. अरुणा वाळके, प्रा. दयानंद झिंजुर्डे यांची उपस्थिती होती. प्रस्ताविक प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी केले.

मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे ज्ञान, मेहनत आणि संघर्ष यांचे जिवंत प्रतीक आहेत. त्यांनी दिवसाचे अठरा तास अभ्यास करून स्वतःला घडवले. आजच्या विद्यार्थ्यांनीही किमान दहा तास अभ्यास करण्याचा संकल्प करून




मोठ्या ध्येयाकडे वाटचाल केली पाहिजे."

"बाबासाहेबांना केवळ पुतळ्यांमध्ये न पाहता पुस्तकांमधून आणि आपल्या कृतीतून जगले पाहिजे. खरे अभिवादन म्हणजे त्यांच्या विचारांचे आचरण होय," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्याचे आणि संशोधनाची आवड निर्माण करण्याचे आवाहन केले.

"परिस्थितीवर तक्रार न करता चिखलातून उमलणाऱ्या कमळाप्रमाणे स्वतःला विकसित करा. पराभवाने माणूस संपत नाही, प्रयत्न न केल्याने तो संपतो," हा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. के. के. पाटील यांनी डॉ. आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचा गौरव करताना विद्यार्थ्यांना न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास सुमारे ६० विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शेवटी प्रा. डॉ. अरुणा वाळके यांनी आभार मानले.